SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
Estd : 1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

**:: परिपत्रक ::**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना शासन व विद्यापीठाकडून प्रथम वर्षाकरिता कायम विनाअनुदानित अतिरिक्त तुकडया विहीत कार्यवाहीनुसार मंजूर करण्यात आलेल्या आहेत. तथापि, द्वितीय/तृतीय वर्षाच्या तुकडयांची संख्या तुलनेत कमी असल्याने अशा महाविद्यालयांमध्ये द्वितीय/तृतीय वर्षासाठी अतिरिक्त विद्यार्थी उपलब्ध होऊन प्रवेशाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

सबब, सदरची बाब विद्यापीठ अधिकार मंडळामध्ये धोरणात्मक निर्णयार्थ सादर करण्यात आली असता, खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

१. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये शासन मान्यतेनंतर प्राथमिक संलग्नीकरण प्राप्त झालेल्या कायम विनाअनुदानित अतिरिक्त तुकडयांना नैसर्गिक विस्तार/वाढ देण्यात यावी. तथापि, संबंधित महाविद्यालयाने नैसगिक विस्तार/वाढीकरिता विद्यापीठास विहीत शुल्कासह संलग्नीकरण प्रस्ताव देणे अनिवार्य आहे.
२. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये शासन मान्यतेनंतर प्राथमिक संलग्नीकरण प्राप्त झालेल्या विनाअनुदानित जलदगती तुकडयांना फक्त अभ्यासक्रमाच्या कालमर्यादेपुरती नैसर्गिक विस्तार/वाढ देण्यात यावी. तथापि, संबंधित महाविद्यालयाने नैसर्गिक विस्तार/वाढीकरिता विद्यापीठास विहीत शुल्कासह संलग्नीकरण प्रस्ताव देणे अनिवार्य आहे.

उपरोक्त निर्णय अवलोकनी घेऊन विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/संस्थामध्ये सुरू असलेल्या अनुषंगिक तुकडयांबाबत संलग्निकरणाची उचित कार्यवाही करावी.

आदेशान्वये,

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

संदर्भ क्र. : शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ 542
दि. 0 3 AUG 2020

E:\E\Baba\2017-18\Circular Format.Docx